<u>नि. फौ. ख. क्र.१३२/२०१५</u> निशाणी क्र.७८

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र.४ यांचा शपथेवर जबाब</u>**
**<u>मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की,</u>**

नाव – कैलास सुखदेव गवई

वय – ६० वर्षे, व्यवसाय – सेवानिवृत्त हे.कॉ.

पत्ता – रा. मित्र नगर, अकोला, ता. जि. अकोला.

**<u>सरकारतर्फे सरकारी वकिल श्री. एच. ए. जुनारे यांचेमार्फत सरतपास सुरुः</u>**

१. मी दि.१८.०६.२०१४ रोजी बाळापूर पो.स्टे. येथे पोलीस नाईक म्हणून कार्यरत होतो. त्यावेळी पो.स्टे. येथे पो.स्टे. अधिकारी म्हणून श्री. पाटील हे कार्यरत होते. मी त्या दिवशी दिवसपाळी कर्तव्यावर हजर असताना पो.स्टे. अधिकारी श्री. पाटील यांनी मला सांगितले की, सर्वोपचार रुग्णालय, अकोला येथून त्यांना फोनद्वारे माहिती मिळाली होती की, जखमी हा हॉस्पीटल येथे उपचार घेत असून त्याचा जबाब नोंद करावयाचा आहे. त्यानुसार मी सर्वोपचार हॉस्पीटल, अकोला या ठिकाणी जखमी जगतपाल वानखडे चा जबाब नोंद करण्याकरीता गेलो. त्या ठिकाणी मी जगतपाल वानखडे हा वॉर्ड क्र.१३ मध्ये उपचार घेत होता, मी त्याचा जबाब त्याच्या सांगण्याप्रमाणे नोंद करुन घेतला. त्याने त्याच्या जबाबात सांगितले की, दि.११.०६.२०१४ रोजी चार आरोपींनी त्यास जुन्या वादातून संगनमत करुन त्याचा नोकर सोनाजी हा काही दिवसापुर्वी जगतपाल वानखडे याच्या हॉटेलमध्ये नोकरी करण्याकरीता गेला या कारणावरुन आरोपी क्र.१ ते ४ यांनी त्यास लोखंडी फायटर व थापडाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच त्याच्या अंगावर मोटारसायकल लोटुन दिली. सदर मारहाणीमध्ये त्याच्या बरगडीस मार व पायाला मोटरसायकलच्या सायलन्सर लागले, त्यामुळे तो उपचार घेत होता. सदर जबाबातील मजकूर हा मी त्यास वाचून दाखविला होता त्यानंतर त्याने त्यावर सही केली होती. आता मला नि.क्र.५६ कडील फिर्यादी जबाब दाखविण्यात आला त्यावर माझी जखमी जगतपाल याची सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदरचा जबाब नोंद केल्यानंतर मी तो पो.स्टे. अधिकारी श्री. पाटील यांना दिला. त्यावर त्यांनी शेरा मारुन गुन्हा नोंदविण्याबाबत आदेशित

केले. त्यावरुन पोलीस अधिकारी रविंद्र कावल यांनी सदर जबाबावरुन आरोपीविरुध्द मारहाणीचा गुन्हा दाखल केला.

सरतपास पूर्ण.

**<u>आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. मो. जुबेर यांचे मार्फत उलटतपासः</u>**

२. मी रिपोर्ट दिल्याची तारीख वेळ सांगू शकतो. रिपोर्ट दि.१८.०६.२०१४ रोजी दिला होता. मी दि.१८.०६.२०१४ रोजी कर्तव्यावर हजर असल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा तपासिक अधिकारी यांना दिला नव्हता. मी स्वतःहून सांगतो की, मला माझ्या वरीष्ठांनी आदेश दिल्याने मी सर्वोपचार रुग्णालय, अकोला येथे गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी त्या दिवशी कर्तव्यावर हजर नसल्याकारणाने तपासिक अधिकारी यांना त्याबाबतचा पुरावा दिलेला नाही. मला त्या दिवशी पो.स्टे. अधिकारी श्री. पाटील यांनी तोंडी आदेश दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, मला श्री. पाटील यांनी कोणतेही तोंडी आदेश दिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वरीष्ठांच्या सांगण्याप्रमाणे मी खोटी साक्ष दिली आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासादरम्यान कथन केलेल्या सर्व बाबी खोट्या सांगितलेल्या आहेत.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

**दिनांकः– २४.०७.२०२५**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत**

DAYANAND MARUTI WAGHMARE
Digitally signed by DAYANAND MARUTI WAGHMARE
Date: 2025.07.24 17:43:57 +0530

**(डी. एम. वाघमारे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.२), बाळापूर.**

<u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :– | **श्री. डी. एम. वाघमारे,**<br>सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर. |
| लघुलेखकाचे नाव | :– | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :– | २४/०७/२०२५ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :– | २४/०७/२०२५ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :– | २४/०७/२०२५ |